ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area International Research journal | Nov., 2018 Issue-47, Vol-02 | 01

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

Nov., 2018, Issue-47, Vol-02

**Editor**
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120-MH2013-PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

112

# Index

01) Achieving the Millennium Development Goals through ICT
**Dr. Rajesh Agarwal, Mathura** || 10

02) A study on the Nodal anatomy of vitex negundo L (Verbenaceae)
**M.A. Bangar, Nanded** || 14

03) A Study on Role of Agriculture in Rural Development
**Dr. Umesh Gupta** || 15

04) The Role of the Service Sector in Economic Development of India
**Dr. B.V. Halmandage, Vasantnagaar** || 17

05) INFLIBNET INFORMATION AND LIBRARY NETWORK CENTRE
**Kuldeep Kaur, Raikot** || 23

06) CRITICAL ANALYSIS OF CROP-INSURANCE SCHEMES AND IT'S EFFECTIVENES ...
**Mane Rahul Raghunathrao, Aurangabad** || 26

07) DEPLETION OF FOREST COVER IN ASSAM: A THREAT TO ENVIRONMENT ...
**Dr. Shashwati Nath, Kamrup** || 30

08) National Digital Library of India: A Boon for Users
**Mr. Manoj P. Waghmare, Chandur Rly, Mr. Shubham Polade, Wardha** || 33

09) A STUDY ON SOFT SKILLS OF HIGHER SECONDARY SCHOOL TEACHERS
**Dr. A. Selvaraj, Dr. M. Rajakumar, Vellore** || 36

10) Role of urban center in rural development : a case study of Auraiya
**Dr. Samar Kant Kumar, Auraiya (U.P.)** || 41

11) Survey on Haemoglobin level in the different age group of female ...
**Sanap N.P., Nanded** || 46

12) The role of NAAC in Higher Education
**Prof. Warghade Janardhan Bhau, Palghar** || 48

13) Decoding 'Realism' Through Plays of Vijay Tendulkar
**Rajeev Yadav, Unnao** || 50

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

14) Preference for Big Data Predictive Analytics in Human Resource ...
**Pooja Sharma, Ahmedabad** || 56

15) A study on The Women Empowerment through Women Entrepreneurship ...
**Dr. Job Dondapati, Surat** || 63

16) MGNREGA IN KARNATAKA: A STUDY ON THE SOCIO ECONOMIC CONDITIONS ...
**Dr. Y. Gangadhara Reddy, Bangalore, Nagendrappa K.T., Shimoga** || 72

17) A Study of Human Development Index and Comparison of New and old ...
**Prof. Dr. K.K.Patil, Manorama Shridhar Pawar, Nandad.** || 79

18) Parameters Affecting Buying Behaviour of Rural Consumers ...
**Dr. Hitesh Kumar Pant, Dr. Pratibha Pant, Mrs. Anita Tiwari, Nainital** || 83

19) महानुभावांचे चरित्रग्रंथ व लोकाचरित्रांची अपूर्वता
**प्रा. डॉ. भूषण आर. बंड, नागपूर** || 93

20) पेशवेकालीन अर्थव्यवस्थेतील नाणे आणि त्यांचे व्यावहारिक व ऐतिहासिक महत्त्व
**डॉ.प्रा. उमेश पाडुरंगजी तुळसकर, समुद्रपूर** || 95

21) शेतक-यांचा कैवारी - म.फुले
**प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे, जि.बुलडाणा** || 100

22) महाराष्ट्रातील प्रमुख ऐतिहासिक — म्हसोबा यात्रा
**डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी, जि. ठाणे** || 103

23) सामाजिक पुनर्रचनेच्या ध्यासाची कविता
**डॉ.श्रीराम गोविंद गव्हाणे, जि.नांदेड** || 105

24) आदिवासी लोकगीतातून स्त्रीयांचे चित्रण
**प्रा. केंद्रे सीता लक्ष्मणराव, जि.बीड** || 107

25) नंदुरबार जिल्ह्यातील शेततळी योजनेचे वित्तिय व्यवस्थापन- एक सुक्ष्म अध्ययन
**गावित दिपक दामू, प्रा.डॉ.डी.आर.जगताप, नंदुरबार** || 109

26) मध्ययुगातील भक्तीमार्गाचे पुरस्कर्ते : संत एकनाथ
**प्रा. डॉ प्रल्हाद होंडे, घनसावगी** || 113

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



114

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area International Research journal | Nov., 2018 Issue-47, Vol-02 | 0100

21

# शेतक-यांचा कैवारी - म.फुले

प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे
संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेड राजा, जि.बुलडाणा

***********

शुद्र दीनबंधू शेतात खपतो || कुटुंब पोसतो || बैलासह ||
साऱ्यासह वारी लोलफंडास || घाली भरतीस || काही धान्य ||
- म.जोतिबा फुले...

जोतिरावांचा जन्म ११ एप्रिल १८२७ ला पुण्यात झाला. गोविंदरावांनी जोतिबांना वयाच्या १७ व्या वर्षी गावठी मराठी शाळेत घातले. चार वर्षात या शाळेतील अभ्यासक्रम पुरा होतो न होतो, तोच त्यांचे शिक्षण बंद केले. शिक्षण बंद केल्यामुळे जोतिबा घरच्या बागेत काम करु लागले. जोतिबांचा जन्मच शेतकरी कुटुंबात झाला असल्यामुळे, त्यांना बालपणापासून शेती आणि शेतीविषयीची माहिती होती. त्यांचे देशप्रेम हे देशातील लोकांविषयीच्या त्यांच्या आपुलकीतून निर्माण झालेले होते. समाजाच्या अगदी खालच्या घरातील गरीब व कष्टाळू माणसांशी तादात्म ही त्यांची सहज प्रवृत्ती होती.

स्त्रीशुद्रादी शुद्र म्हणजे, सर्व उपेक्षित समाज हा या देशाचा भाग्यविधाता आहे. शेतकरी हा या देशाचा पोर्षीदा आहे. या ठोस भूमिकेतून त्यांनी शेतक-याचा आसुड १८ जुलै १९८३ लिहीला. १०० वर्षापूर्वी शेतक-यांची अत्यंत दैनिय अवस्था होती. आता पर्यंतच्या एकून भारतीय परंपरेत शेतीचा एवढ्या गंभीरपणे विचार कुणी केला नव्हता. म.फुल्यांच्या समकालीन सुधारकांना ही कधी शेतीबद्दल, शेतक-यांबद्दल विचार करावसा वाटला नाही. म.फुल्यांनी शेतकरी, कष्टकरी हा प्रतिष्टीत असला पाहिजे. आणि शेती हि उत्तम केली पाहिजे. या दृष्टीने प्रथमच विचार मांडले. ग्रामीण जनता, तिचे प्रश्न, त्यांची दु:खे यांना प्रथमत:च वाचा फुटली ती म.फुले यांच्या रुपाने.

नव्या शेतसारा पध्दतीमुळे आणि दुष्काळासारख्या आपत्तीमुळे शेतकरीवर्ग कर्जबाजारी झाला होता. त्यामुळे शेतकज्यांच्या जमिनी सावकाराकडे जावू लागल्या. अतिशय सुलभतेने घडणारे जमिनिचे हस्तांतरण शेतक-यांचे जिवन उध्वस्त करणारे होते. या प्रश्नावर इंग्रज सरकारशी गंभीर चर्चा होवून सरकारला १८७९ मध्ये जमिनिचे हस्तांतरण थांबविण्यासाठी डेक्कन अॅग्रिकल्चरल रिलिफ अॅक्ट पास करावा लागला. या कायद्याने सावकारांवर अनेक बंधने घाल्याण्यात आली शेतक-यांना थोडासा दिलासा मिळाला.

दारिद्रय आणि अज्ञानाने शेतक-यांच्या जिवनात थैमान घातले होते. इंग्रजांनी रयतवारी पध्दती सुरू केल्यामुळे शेतसा-याची जबाबदारी शेतक-यावर पडली. हा शेतसारा अनेकदा एकूण उत्पन्नापेक्षा भरपुर जास्त असे. असे खुद एलफिस्टन या इंग्रज अधिका-यानेच कबुल केले आहे. याच परिस्थितीत भारतात लागोपाठ दुष्काळ पडत गेले. त्यामुळे शेतक-यांची अवस्था खुप दैनिय बनली. इंग्रज येण्यापूर्वी शेतकरी कुटुंबातील काही तरुण सदस्य सैन्यात भरती असत. इंग्रज भारतात आल्यानंतर त्यांनी अनेक संस्थानिकाकडील सैन्यात कपात केली. त्यामुळे नोकरीतून शेतकरी कुटुंबास मिळणारे उत्पन्न बंद झाले. व परत घरी आलेल्या सैनिकांचा बोजा शेतीवर पडला. सतत पडणा-या दुष्काळामुळे शेतीची उत्पादनक्षमता कमी-कमी होत चालली होती. शेतकरी, कष्टकरी यांची स्थिती अत्यंत हालाखीची होत चालली होती.

या संधीचा फायदा सावकार व मारवाड्यांनी घेतला. त्यांनी अज्ञानी आणि गरजु शेतक-यांना भरमसाठ व्याजाने कर्ज देवून ते त्यांची पिळवणुक व फसवणुक करु लागले. परिणामत: वर्षानुवर्षे जमिन कसणारा शेतकरी कर्जबाजारी व भुमिहिण होवू लागला. त्याची परिस्थिती अत्यंत नाजुक व हालाखीची बनु लागली म्हणजेच हजारो शतकानु शतकापासून शेतक-यांचे हाल सावकार, मारवाडी व लहरी निसर्ग यांच्यामुळे चालूच होते. तशातच इंग्रज सरकारच्या नव्या धोरणामुळे आणि जाचक कायद्यामुळे शेतक-याच्या दैन्यात भरच पडत चालली होती.

म.फुल्यांचे एकून लेखनच मुळी शेतकरी, कष्टकरी यांचा आक्रोश शब्दांकित करणारे आहे. शेतकज्याचा आसुड मध्ये ते अधिक धारदार, अधिक टोकदार आणि विस्तारीत स्वरुपात असलेले आपणास दिसून येते. म.फुल्यांचा हा ग्रंथ त्यांच्या एकून वाङ्मया संदर्भात मोलाचा आहे. या ग्रंथात त्यांनी शेतकज्यांच्या अवनत स्थितीची मुलगामी मिमांसा केली आहे. आणि ती सुधारण्यासाठी सर्वांगीण उपाययोजना ही सुचविल्या आहेत. शेतक-यांची स्थिती सुधारण्यासाठी म.फुले यांनी सांगितलेले उपाय :-

शेतकज्यांची स्थिती सुधारण्यासाठी म.फुले त्यांच्या अखंडामध्ये लिहितात.

विद्येविना मती गेली || मती विना निती गेली ||
निती विना गती गेली || गती विना वित्त गेले ||
वित्ता विना शुद्र (शेतकरी) खचले || एवढे अनर्थ एका अविद्येने केले||

**१) शेतक-यांना शिक्षण देणे :**

शेतकरी अज्ञानी, अडाणी असल्यामुळे तो अनेक धार्मिक व अंधश्रध्देच्या रुढीत गुरफटून गेला आहे. सावकार, मारवाडी, परकीय



115

सरकार शेतक-यांना लुबाडीत आहेत. त्यामुळे त्यांनी सर्वांगिण शिक्षणासाठी १८४८ पासून पुणे व पुण्याच्या परीसरात शाळा सुरू केल्या व सकल बहुजन समाज शिक्षित करण्याचा प्रयत्न केला.

**२) सहकारी तत्वावर शेती :**

शेतीतून अधिक उत्पन्न मिळावे, जमिनिचे तुकडीकरण होवू नये, सर्वांना शेती करता यावी म्हणून त्यांनी सहकारी शेतीची उपाययोजना शासन व शेतक-यांना सांगितली. सहकार शेतीचा पुरस्कार त्यांनी केला.

**३) शेतीचे औद्योगिकरण :**

कृषि औद्योगिकरणाचा व शेतीच्या आधुनिकीकरणाचा ते आग्रह धरीत. परंपरागत शेती करण्याला त्यांचा विरोध होता. शेतीमध्ये आधुनिक पध्दतीची अवजारे व बि-बियाणाचा वापर केला पाहिजे. व शेतीमध्ये जास्तीत जास्त उत्पन्न झाले पाहिजे. यासाठी ते शेतीच्या आधुनिकीकरणावर भरत देत.

**४) शेतक-यांच्या शोषणाला विरोध :**

शेतक-यांच्या शोषणाला त्यांनी विरोध केला. सावकार, मारवाडी यांच्या विरोधी त्यांनी आंदोलने उभारली. शेतक-यामध्ये त्यांनी एकजुट करण्याचा प्रयत्न केला.

**५) शेतक-याच्या दैन्यावस्थेला आळा घालण्याचा प्रयत्न :**

शेतक-याच्या दैन्यावस्थेला जबाबदार असणा-यांवर त्यांनी आपल्या लिखानातून व भाषणातून कोरडे ओढले. त्यातून त्यांनी ब्रिटीश सरकारला ही वगळले नाही.

**६) जमिनीच्या तुकडीकरणाला विरोध :**

लोकसंख्येच्या बेसुमार वाढीमुळे शेतीवर बोजा पडत होता. त्यामुळे जमिनीचे तुकडीकरण ही मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होत आहे. त्यामुळे त्यांनी जमिनिच्या तुकडीकरणाला विरोध केला.

**७) शेतीला पाणी देण्याची सुविधा :**

आज आपण पाणी वाटपावर चर्चा करतो. म.फुल्यांनी शेतक-याचा आसूड मध्ये सांगितले होते की, पाणी वाचविण्यासाठी ठराविक आकाराच्या नळ्याव्दारे शेतीला व पिकांना पाणी देण्याची व्यवस्था करण्यात यावी. यातून म.फुल्यांचे द्रष्टेपणा दिसून येतो.

**८) शेतक-यांच्या दुःखास वाचा फोडली :**

इंग्रज सत्ताधिका-यासमोर शेतक-यांचे दुःख मांडले. ड्युक ऑफ कनॉट यांच्या सत्कार प्रसंगी त्यांनी केलेले भाषण संस्मरणीय आहे. आपल्या समोर रेशमी कपडे नी अलंकार परीधान केलेले श्रीमंत, सरदार आणि जहागिरदार पाहून रयते विषयी आपण मत बनवु नये. खरा हिंदूस्थान बघावयाचा असेल तर मजबरोबर खेड्यात चला. असे त्यांनी युवराजांना स्पष्टपणे सांगितले.

**९) शेतक-यांच्या मुलांना शेतिविषयक शिक्षण :**

शेतीचे उत्पन्न वाढण्यासाठी, शेतक-यांची स्थिती सुधारण्यासाठी शेतक-यांच्या मुलांना शेतिविषयक शिक्षण देण्याची गरज असल्याचे त्यांनी सर्वांना पटवून दिली.

**१०) आदर्श शेतीची योजना :**

शेतक-यांना मॉडेल म्हणून आदर्श अशा शेताची निर्मिती करावी. जिच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना शेतीच्या ज्ञानाविषयी, उपयुक्तते विषयी माहिती होईल. चांगले उत्पादन घेणा-या शेतक-यांचा सत्कार करण्यात यावा. उत्कृष्ट शेती करणा-या शेतक-यांना बक्षिसे देण्यात यावी.

**११) जमिनिची सुधारणा करावी :**

यामध्ये जमिनिचे सपाटीकरण, नालाबंढ्ढीग, पानथळ जमिनिला चर मारणे, शेंद्रीय खतांचा वापर करणे, या सारख्या अनेक उपाययोजना म.फुले यांनी सांगितल्या आहेत.

**१२) शेतीसाठी पाणी :**

शेतक-यांची शेती निसर्गावरच अवलंबून नसावी, म्हणून मोठ-मोठी धरणे बांधून व पाटामार्फत शेतीला पाणि देण्याची सुविधा करावी. हे पाट प्रत्येक शेतक-याच्या शेतापर्यंत पोहचले पाहिजेत. बारामाही शेतीला पाणि मिळाले पाहिजे.

**१३) पशु संशोधनाची गरज :**

शेतीसाठी लागणा-या पशुधनाची (गुरांची) निपज ही संक्रीत झाली पाहिजे. बैल खुप धष्ठपुष्ठ असले पाहिजेत. गाय, म्हैस, शेळी या जास्तीत जास्त दुध कसे देतील यावर संशोधन झाले पाहिजे. जेणे करुन शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

**१४) जमिनिची धुप थांबविणे :**

जमिनिची धुप कमीत-कमी कशी होईल, याकडे लक्ष देण्याची गरजही म.फुले यांनी व्यक्त केली. त्यासाठी उपाययोजना होणे गरजेचे आहे.

**१५) सैनिकांचा उपयोग :**

शांततेच्या काळात शेती सुधारण्याच्या विधायक कार्यात सैनिकांचा उपयोग घेतला पाहिजे. तो कसा घेता येईल व शेती उत्पादन कसे वाढविता येईल यावरही संशोधन झाल्यास शेती उत्पन्नात वाढ होईल.

**१६) शेतक-यांसाठी परदेश दौरे :**

अन्य सुधारलेल्या राष्ट्रात शेती कशी केली जाते. ते कोणती

अवजारे, कोणती बियाणे वापरतात. यांचे शिक्षण देण्यासाठी भारतीय शेतकरी व त्यांच्या मुलांना परदेशात पाठविणे व त्यांना ते शिक्षण देणे अत्यंत आवश्यक असल्याचे म.फुल्यांनी मत व्यक्त केले आहे.

**१७) चोरापासून शेतीचे संरक्षण :**

शेतातील पिकांची व मालाची चोरी झाल्यास शेतक-यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. म्हणून अशा चो-या होवूच नये. म्हणून उपाययोजना करणे व चोरी झाल्यास संबंधित पोलिसांना दोषी ठरवून त्यांना दंड व शिक्षा केल्या पाहिजेत.

**१८) सावकार व व्यापा-यावर नियंत्रण :**

शेतक-यास लुटणाज्या व शेतक-यांच्या दैन्यावस्थेस कारणीभुत असणा-या सावकार व व्यापा-यावर कडक नियंत्रण ठेवले पाहिजे. शेतकज्याची पिळवणुक करणा-यांना कठोर शासन ही केले पाहिजे.

**१९) ब्रिटीश भांडवलदारांवर नियंत्रण :**

भारतीय सावकाराप्रमाणे ब्रिटीश भांडवलदार ही शेतक-यांना कर्ज देत. परंतु त्यांच्या व्याजाचा दर हा खुप मोठा असे. म.फुल्यांच्या भाषेत ते शेतक-याकडून आवाच्या सवा व्याज घेत. त्यामुळे ब्रिटीश भांडवलदारावर ही कायद्याने नियंत्रण घालणे आवश्यक होते.

**२०) गोवध बंदी कायद्याची गरज :**

शेतीसाठी आवश्यक असलेल्या पशुधनाच्या संरक्षणासाठी गोवध बंदी केली पाहिजे. कारण त्याकाळी धर्मिक विधीसाठी व मास खाण्यासाठी गार्यीची मोठ्या प्रमाणावर कत्तल केली जात होती. त्यासाठी गोवध बंदीचा कायदाच असला पाहिजे असे म.फुल्यांचे मत होते.

**२१) शेतक-यांच्या मुलांचे नैतिक अधःपात :**

शेतक-यांच्या मुलांचे नैतिक अधःपात होवू नये. त्यांचा जिवनावरचा विश्वास उडू नये. त्याला भविष्यात चांगले दिवस व संधी येतील अशी अशा वाटली पाहिजे. त्या दृष्टीने त्यांचे प्रबोधन ही झाले पाहिजे.

**२२) किफायतशीर शेतीची संकल्पना :**

किफायतशीर शेतीची संकल्पना सुध्दा म.फुलेंनी आपल्या ग्रंथात विषद केलेली आपणास दिसून येते.

सर्वस्वी कंगाल बनलेल्या शेतक-यात असंतोष माजू नये म्हणून शेतक-यांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने इंग्रज सरकार जे कायदे करीत होते, त्याचा फायदा शेतकज्यांना मिळावा म्हणून म.फुले जागरुक असत. तत्कालीन सार्वजनिक सभेसारख्या संस्था आणि प्रागतिक वृत्तपत्रे एकीकडे शेतिविषयी शाब्दीक सहानुभुती दर्शवित. पण प्रत्यक्षात मात्र सावकार आणि जमिनदार यांच्या बाजूचेच समर्थन करीत असत.

ख-या अर्थाने भारतीय शेतक-यांच्या दुःखाला म.फुल्यांनीच वाचा फोडली. या देशातील दुःखी, पिडीत, शेतकरी हालाखिच्या परिस्थितीतून कसा सुटेल. त्याची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक स्थिती कशी सुधारेल यासाठी म.फुल्यांनी खुप प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश ही आल्याचे आपण बघत आहोत.

म.फुल्यांनी शेती व शेतकरी यांची स्थिती सुधारण्यासाठी सुचविलेल्या उपाययोजनांचा तंतोतंत अवलंब केल्यास भारतीय शेतकज्यांची स्थिती कमी कालावधीत सुधारेल. व भारत सुजलम् सुफलम् बनण्यास वेळ लागणार नाही. फक्त गरज आहे महापुरूषांनी सांगितलेल्या मार्गाचा अवलंब करण्याची त्या मार्गानुसार वागण्याची.

**संदर्भग्रंथ :**

१) म.फुले समग्र वाङ्मय - संपादक य.दो.फडके.
२) म.फुले साहित्य आणि चळवळ - संपादक हरी नरके.
३) शेतक-याचा आसुड - म.फुले.

❑❑❑



117